पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिति
**कार्यपत्रिका क्रमांक – १३३**
(सभावृत्तांत)

**दिनांक – २२/०८/२०१९** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **गुरूवार दि.२२/०८/२०१९** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.ममता विनायक गायकवाड
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.लोंढे नम्रता योगेश
७. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
८. मा.चोंधे आरती सुरेश
९. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
१०. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
११. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
१२. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१३. मा.कलाटे मयूर पांडूरंग
१४. मा.कलाटे राहुल तानाजी

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखा परिक्षक, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे – मुख्य लेखाधिकारी, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.तुपे, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.वाघमारे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.दांगट – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.केंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH,

मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.जुंधारे, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.मोरे, मा.पवार, मा.देशमुख, मा.सेठीया, मा.राणे, मा.वाघुंडे, मा.पोरेड्डी, मा.रामगुडे - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.बहुरे, मा.वस्ते – प्रशासन अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३१) भाग क्र.२८ पिंपळे सौदागर मधील आरक्षण क्र.३६७ अ खेळाचे मैदान विकसीत करणे या कामाअंतर्गत विद्युत विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.३२) भाग क्र.२८ पिंपळे सौदागर मधील आरक्षण क्र.३६२ खेळाचे मैदान विकसीत करणे या कामाअंतर्गत विद्युत विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.३३) प्र.क्र.१९ रावेत स.नं.७५ त भोडवे बाग पर्यंतच्या (दोन BRTS फीडर रूंद) १८ मीटर रस्ता विकसीत करणेबाबत.

विषय क्र.३४) मनपा दवाखाना/रूग्णालयातील लिनन (कपडे) धुलाई करणेकामी होणा-या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्र.३५) सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पातील ई क्षेत्रीय स्थापत्य कार्यालयातील कामांच्या तरतूदी मध्ये वाढ/घट करणेबाबत.

विषय क्र.३६) मे.इन्फिनिटी कन्संलटींग इंजिनिअर्स यांची प्रभाग क्र.३ मोशी येथील मोरया कॉलनी/फातिमा नगर, खानेदेशनगर, संत ज्ञानेश्वर इ. ठिकाणचे रस्ते अद्यावत पध्दतीने विकसित करणे या कामास सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.३७) पिं.चि.मनपाच्या इमारती मागील I to R मध्ये ताब्यात आलेल्या भूखंडावर नविन प्रशासकिय इमारत बांधणे व अनुषंगिक कामे करणे कामास तज्ञ वास्तु विशारद यांची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.३८) तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरलेल्या समुह संघटक पदाचे मुदतवाढीबाबत.

विषय क्र.३९) पिं.चि.मनपाच्या ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध विकास कामे करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.४०) पिं.चि.मनपाच्या ग क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध विकास कामे करणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.४१) शालेय पोषण आहाराबाबत – मा.आरती चोंधे, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२) अभियंता दिनानिमित्त आयोजित करावयाच्या प्रशिक्षणा बाबत. - मा.आरती चोंधे, मा.करूणा चिंचवडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३) वर्गीकरण करणेबाबत – मा.शितल शिंदे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४) सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षकातील प्रभाग क्र.२५ वाकड, ताथवडे, पुनावळे मधील निविदेतील विकास कामांना वाढीव तरतूद

मिळणेबाबत. – मा.सागर आंगोळकर, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४५) मा.स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.११७ मधील विषय क्र.१ व ६ ते १५ विषय दिनांक १८/०९/२०१९ चे सभेत घेणेबाबत – मा.राहूल कलाटे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक ०७/०८/२०१९ व दि.१४/०८/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१३१) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १४/०८/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१३२) चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक - ५२२१ विषय क्रमांक – १
दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – नागरवस्ती विकास
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नावियो/२/कावि/१०३/१९ दि.१३/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.०४ दि.२६/०७/२०१९ अन्वये महिला बचत गटांसाठी मिशन स्वावलंबन हा उपक्रम प्रस्तावात नमूद प्रमाणे राबविणेकामी महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे या शासन अंगीकृत संस्थेची मनपा अधिनियमाचे प्रकरण ५(२) (२) नुसार थेट पध्दतीने २०१९-२० ते २०२१-२२ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करणे व या उपक्रमासाठी येणा-या र.रु.३,०३,४८,१५०/- (अक्षरी र.रु.तीन कोटी तीन लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे पन्नास फक्त) चे खर्चास व सदरची रक्कम सदर संस्थेच्या मागणीनुसार टप्प्या टप्प्या प्रमाणे अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२२२ विषय क्रमांक – २
दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.माजसं/१/कावि/३३४/१९ दि.२७/०७/२०१९

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागाकरिता जनतासंपर्क अधिकारी पद करार पध्दतीने सहा महिने कालावधीसाठी भरणे व त्याकामी प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.२ दप्तरी दाखल करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५२२३ विषय क्रमांक – ३
दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९५/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची बालभवन व्यायामशाळा खराळवाडी हि सदानंद तरुण मित्र मंडळ बजरंगनगर पिंपरी यांना सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत संपुष्टात आल्याने त्यांना मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.३ चा विचार दि.१८/०९/२०१९ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२२४ विषय क्रमांक – ४
दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.आरती चौंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९४/२०१८ दि.१४/१२/२०१८

विषय - मनपाची कै.संजय काळे हेल्थ क्लब निगडी हि व्यायामशाळा संग्राम स्पोर्टस क्लब, से.नं.२८, प्राधिकरण यांना सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळेची मुदत संपुष्टात आल्याने त्यांना मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४ चा विचार दि.१८/०९/२०१९ चे सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२२५ विषय क्रमांक – ५
दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२६६/२०१९ दि.०३/०८/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.80/3/2018-19 अन्वये प्रभाग क्र.६ मधील चक्रपाणी वसाहत, सद्गुरूनगर, महादेवनगर, मोहननगर. परिसरामध्ये रस्त्यांची खडीकरण व बी.बी.एम.पध्दतीने सुधारणा करणेकामी मे.ए.एफ.मंजाळकर नि.र.रू.56,81,151/- (अक्षरी र.रु. छप्पन लाख एक्याऐंशी हजार एकशे एक्कावन्न फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.55.94.899/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.55,94,899/- पेक्षा 10.10% कमी म्हणजेच र.रु.50,29,814/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.42,402/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.43,850/- = एकुण र.रु.51,16,066/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील

निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२२६ | विषय क्रमांक – ६

दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – इ प्रभाग, पाणीपुरवठा

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.इप्र/पापु/मुख्य/८/कावि/८४८/१९ दि.०३/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

इ प्रभागातील विविध टाक्यावरून पाणीपुरवठा करण्यासाठी मजूर पुरविणेकामी जुनी तरतुद संपल्याने नवीन वाढीव खर्च होत असल्यामुळे सध्या सन २०१९-२० पान क्र.६८४/२५ या कामामधुन र.रु.९०,००,०००/- तरतुदीमधुन खर्च टाकणेसाठी तसेच सदर काम नविन निविदा आदेश होईपर्यत सध्या करिता असलेले ठेकेदार मे.शुभम उद्योग यांचेकडुन काम करुन घेणेस व त्याकरिता आवश्यक ती सुधारित प्रशासकिय मान्यता र.रु.३,६०,००,०००/- (अक्षरी र.रू.तीन कोटी साठ लाख फक्त) व र.रु.१,२०,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी वीस लाख फक्त) चा खर्च करणेस मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयातील कामाकरिता दि.३०/०९/२०१९ पर्यंत येणा-या र.रू.१,०९,६३,२३४/- (अक्षरी र.रू.एक कोटी नऊ लाख त्रेसष्ठ हजार दोनशे चौतीस फक्त) इतक्या वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२२७ | विषय क्रमांक – ७

दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.शितल शिंदे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे कडील पत्र क्र.विमुका/८/कावि/४४१/२०१९ दि.०६/०८/२०१९

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.41/02/2018-19 अन्वये मनपा भाट नगर येथील लिंक रोडवरील विदयुत दाहीनीचे नुतनीकरणे करणेकामी (2018-19) मे.कल्याणी एंटरप्रायजेस. नि.र.रू.1,30,49,586/- (अक्षरी र.रू.एक कोटी तीस लाख एकोणपन्नास हजार पाचशे सहाऐंशी फक्त) पेक्षा 3.00% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२२८ | विषय क्रमांक – ८
दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – स्थापत्य ड/ग मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.राजंद्र गावडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/३१८/१९ दि.०८/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.96-1-2018-19 अन्वये प्र.क्र.२५ ताथवडे गावठाणपासून जीवननगर मार्गे स.नं.९९ व १०० मधून पुनावळेकडे जाणारा २४.०० मी. रुंद रस्ता विकसित करणेकामी मे.व्ही एम मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा लि नि.र.रू.32,66,25,504/- (अक्षरी र.रु.बत्तीस कोटी सहासष्ठ लाख पंचवीस हजार पाचशे चार फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.32,45,48,319/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.32,45,48,319/- पेक्षा 8% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 8.39% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.29,85,84,453/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.19,08,835/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,68,350/- = एकुण र.रु.30,06,61638/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२२९ | विषय क्रमांक – ९
दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी
सूचक – मा.संतोष लोंढे | अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पअक/१/कावि/१४३/१९ दि.०८/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV9/1-2018-19 अन्वये मनपाच्या मैला शुध्दीकरण केंद्र व पंपीग स्टेशनसाठी अखंडीत वीज पुरवठयासाठी (एक्सप्रेस फिडर) आवश्यक व अनुषंगीक कामे करणेकामी (टप्पा २) मे.एस.टी.इलेक्ट्रीकल्स प्रा.लि. यांचेकडुन नि.र.रु.८,९०,०३,०६९/- पेक्षा -१६.४७% कमी या दराने र.रु.७,४३,४४,२६४/- (अक्षरी र.रू.सात कोटी त्रेचाळीस लाख चव्वेचाळीस हजार दोनशे चौसष्ट फक्त) पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदेतील अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेस या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२३० | विषय क्रमांक – १०

दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – उद्यान

सूचक – मा.संतोष लोंढे | अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.उद्यान/६/कावि/४१३/१९ दि.०९/०८/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.३/२०१६-१७ व निविदा नोटीस १० मधील सोबत प्रपत्र अ मधील निविदा समोर दर्शविलेल्या तारखेस संपत आहे. पुढील कालावधीसाठी मा.आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्तावानुसार ११६ उद्यानांसाठी बाब क्र.१ ते १४ कामाच्या निविदा प्रसिध्द करणेत आलेल्या आहे. नजिकच्या काळात महाराष्ट्र विधानसभेची निवडणुक कार्यक्रम असल्याने कर्मचा-यांची निवडणुक कामकाजाची नेमणुका होण्याची शक्याता आहे. तसेच आचारसंहिता देखील लागण्याची शक्यता आहे. सबब सोबत प्रपत्र अ प्रमाणे पुर्वीच्याच ठेकेदाराची मुदत वाढविणे किंवा निविदा अंतिम होईपर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२३१ | विषय क्रमांक – ११

दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.सह शहर अभि.(वि/यां) यांचे कडील पत्र क्र.विमुका/८/कावि/४९०/१९ दि.१४/०८/१९

विषय - प्र.कं.२६ वाकड पिंपळे निलख येथे विवीध ठिकाणी विरंगुळा केंद्र तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे या कामांतर्गत विद्युत विषयक कामे करणेबाबत.

विषय क्र.११ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२३२ | विषय क्रमांक – १२

दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – स्थापत्य उद्यान

सूचक – मा.संतोष लोंढे | अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था.उ/कावि/२०८/२०१९ दि.१३/०८/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्र.क्र.१० राजर्षी शाहू उद्यानाचे पुर्नविकास करणेकामी वास्तूविशारद नेमणूक करणेस, आराखडे तयार करून मंजूरी घेणे, बांधकाम परवानगी घेणे, अंदाजपत्रक तयार करणे इ.निविदा पूर्व कामे व निविदा पश्चात कराव्या लागणा-या कामासाठी स्थापत्य उद्यान विभागामार्फत वास्तुविशारद यांची दरपत्रक मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार मे.आर्कि. हार्दिक पांचाळ आणि असोसिएटस यांचा सदर कामासाठी स्थापत्य १.९८%, हॉर्टीकल्चर ०.९८% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. सदर कामाचे आराखडे व अंदाजपत्रक बनविणे इ. कामे मे.आर्कि. हार्दिक पांचाळ आणि असोसिएटस यांनी मान्य केलेले दरानुसार सदर कामासाठी स्थापत्य १.९८%, हॉर्टीकल्चर ०.९८% दराने काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२३३ | विषय क्रमांक – १३
दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/८ड/कावि/३६४/२०१९ दि.१३/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पदव्युत्तर संस्थेची तातडीची बाब म्हणुन डॉ.किशोर खिलारे यांची सहयोगी प्राध्यापक मेडीसीनया पदावर ३ वर्ष कालावधीकरीता आदेश क्र.वायसीएमएच /८ड/कावि/३४५/२०१९, दि.३१/०७/२०१९ अन्वये नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्यानुसार डॉ.किशोर खिलारे यांना खालील प्रपत्र'अ' प्रमाणे मासिक मानधन अदा करावे लागणार आहे.

**प्रपत्र 'अ'**

| अ.क्र. | सहयोगी प्राध्यापक मानधन | मुळ निवत्ती वेतन | महागाई भत्ता, दि.४/०६/२०१९, १४८% | एकुण (३+४) | द्यावयाचे पारिश्रमिक मानधन (२-४) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १५१३०५ | ३०११२ | ४४५६६ | ७४६७८ | ७६६२७ |

डॉ.किशोर खिलारे, सहयोगी प्राध्यापक मेडीसीन यांना ३ वर्ष देण्यात येणा-या पारिश्रमिक मानधनावरील खर्च दरमहा र.रु.७६,६२७/-(अक्षरी र.रू.शहात्तर हजार सहाशे सत्तावीस फक्त) अपेक्षित आहे. त्यामुळे सदरचा खर्च सन २०१९–२०२० मधील पी.जी.आय, वाय.सी.एम.एच, पी.सी.एम.सी मानधनावरील अध्यापक व कर्मचारी मानधन/वेतन या लेखाशिर्षावर केलेल्या र.रु.१२,००,००,०००/- इतक्या तरतूदी मधुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२३४ | विषय क्रमांक – १४
दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.संतोष लोंढे | अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/८ड/कावि/३६३/२०१९ दि.१३/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पदव्युत्तर संस्थेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात क्रमांक ३२४, वायसीएमएच/८ड/कावि/२५८/२०१९, दिनांक- १४/०६/२०१९ रोजी प्रसिध्द केली होती. डॉ.सत्यजीत सुभाषराव घोडके, सहाय्यक प्राध्यापक, रेडीओलॉजी हे दिनांक ०१/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहीले होते. परंतु सदर जाहीरातीत नमुद केलेल्या अर्हतेनुसार २२ दिवसांचा अनुभव कमी पडत असल्यामुळे त्यांना अपात्र करण्यात आले होते. परंतु त्यांनी सदर २२ दिवसांचा अनुभव बी.जै. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पूणे येथे पुर्ण केला आहे. त्या संबंधित त्यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. तरी सदर जाहीरातीद्वारे उमेदवार

उपलब्ध न झाल्यास त्या रिक्त पदांच्या भरतीसाठी मुलाखतीच्या प्रक्रीयेनंतर दर सोमवारी थेट मुलाखतीद्वारे सर्व पदे भरेपर्यंत भरती करणेस दिनांक १४/०६/२०१९ रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सहाय्यक प्राध्यापक, रेडीओलॉजीही जागा रिक्त असल्यामुळे या रिक्त जागेवर तातडीची बाब म्हणून उमेदवारांची Walk in Interview द्वारे नेमणुक करणे पदव्युत्तर संस्थेसाठी आवश्यक असल्याने डॉ. सत्यजीत सुभाषराव घोडके, सहाय्यक प्राध्यापक, रेडीओलॉजी हे दुबार दिनांक २९/०७/२०१९ रोजी प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहीले असुन त्यांची निवड खालील प्रपत्र ‘अ’मध्ये नमुद केलेल्या पदनामावर करण्यात आलेली आहे.

**प्रपत्र ‘अ’**

| अ.क्र | नाव | पदनाम | प्रवर्ग | द्यावयाचे मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | डॉ. सत्यजीत सुभाषराव घोडके | सहाय्यक प्राध्यापक, रेडीओलॉजी. | इमाव | वेतनश्रेणी १५,६००-३९,१००- ऍके ग्रेड पे- ६,०००/-(एकत्रित मानधन र.रू. ७३,६८१ /-) | |

उपरोक्त प्रमाणे डॉ.सत्यजीत सुभाषराव घोडके, सहाय्यक प्राध्यापक, रेडीओलॉजी यांना देण्यात येणा-या मानधनावरील खर्च र.रू.७३,६८१/- (अक्षरी र.रू.त्र्याहत्तर हजार सहाशे एक्याऐंशी फक्त) इतका प्रपत्र ‘अ’ प्रमाणे देय आहे. त्यामुळे सदरचा र.रू.७३,६८१/- (अक्षरी र.रू.त्र्याहत्तर हजार सहाशे एक्याऐंशी फक्त) होणारा मासिक खर्च सन २०१९–२०२० मधील पी.जी.आय, वाय.सी.एम.एच, पी.सी.एम.सी मानधनावरील अध्यापक व कर्मचारी मानधन/वेतन या लेखाशिर्षावर केलेल्या र.रु.१२,००,००,०००/- इतक्या तरतूदी मधुन करण्यात येईल. डॉ. सत्यजीत सुभाषराव घोडके, सहाय्यक प्राध्यापक, रेडीओलॉजी यांचे नियुक्तीस व त्यांना द्यावयाचे मानधन रकमेचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५२३५ विषय क्रमांक – १५

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – फ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(१) यांचे कडील पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/४५६/२०१९ दि.३१/०७/१९

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

फ क्षेत्रीय कार्यालयातील विविध विकास कामे करणेकरिता वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करणेकामी खालील प्रमाणे नमद केलेल्या मनपाचे विकास कामांना त्यांचे नावासमोर दर्शविलेले वास्तुविशारद/प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व त्याकामी देय असलेली फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | एकक | वास्तुविशारद/ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे नाव | प्राप्त दर ( % ) (जी.एस.टी शिवाय) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निविदा पूर्व कामाकरिता | निविदा पश्चात कामाकरिता | एकूण |
| १ | प्रभाग क्र.११ मधील घरकुल चौकामध्ये स्पाईन रस्त्यावर ग्रेड सेपरेटर तयार करणे. | % प्रती काम | मे.सी.व्ही.कांड कन्सलटंट प्रा.ली. | ०.८८ | १.०१ | १.८९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | प्रभाग क्र.११ मधील स्वामी विवेकानंद हॉल ते थरमॅक्स चौकाकडे जाणा-या रस्त्याचे पद्धतीने कॉंक्रीटीकरण करणे | % प्रती काम | मे.सी.व्ही.कांड कन्सलटंट प्रा.ली. | ०.७१ | १.०० | १.७१ |
| ३ | प्रभाग क्र.११ मध्ये म्हेत्रेवस्ती येथील मनपा शाळा क्र.९२ इमारतीचे विस्तारीकरण करणे. | % प्रती काम | मे.मनस्वी आर्किटेक्ट्स | १.०० | १.०० | २.०० |
| ४ | फ प्रभागात ठिकठिकाणी सुशोभीकरणाची कामे करणे. | % प्रती काम | मे.शिल्पी आर्किटेक्ट्स अँड प्लॅनर्स | १.२५ | ०.७५ | १.९७ |
| ५ | प्रभाग क्र.११ मधील प्राधिकरणाकडून हस्तांतरित झालेल्या मोकळ्या जागेवर व्यायामशाळा बांधणे व इतर कामे करणे. | % प्रती काम | मे.मनस्वी आर्किटेक्ट्स | १.०० | १.०० | २.०० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५२३६ विषय क्रमांक – १६

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.सह शहर अभि.(वि/यां) यांचे कडील पत्र क्र.वि.मुका/८/कावि/४६९/२०१९ दि.१४/०८/२०१९

मा.सह शहर अभि.(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील सोबतचे प्रपत्र अ (1 ते 14) मधिल निविदा कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२३७ विषय क्रमांक – १७

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.जशुके/कावि/२३६/२०१९ दि.१३/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

रावेत येथील जुन्या बंधा-याच्या खालील बाजूस नवीन बंधारा बांधणे या कामाअंतर्गत रावेत बंधा-यातील गाळ काढण्यासाठी मा.कार्यकारी अभियंता (व्दारनिर्मिती विभाग – A) दापोडी, पुणे ४११ ०१२ ही शासकिय संस्था असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अनुसूची प्रकरण नियम २(२) च्या परंतुके नुसार कामाचे निविदा न मागविता व करारनामा न करता काम करणेस व त्यास येणारा खर्च र.रू.६,०६,९०६/- (अक्षरी र.रू.सहा लाख सहा हजार नऊशे सहा फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२३८ | विषय क्रमांक – १८
दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – नागरवस्ती विकास
सूचक – मा.आरती चोंधे | अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नावियो/०२/कावि/३४४/२०१९ दि.०९/०८/२०१९

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील बालवाड्यांच्या भिंती 3 डी पेंटींगद्वारे बोलक्या करणेबाबत.

विषय क्र. १८ दप्तरी दाखल करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२३९ | विषय क्रमांक – १९
दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/४४७/२०१९ दि.१३/०८/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. 99/1/2018-19 अन्वये प्रभाग क्र.६ मध्ये धावडे वस्ती, सदगुरू नगर, भगतवस्ती मधील नाल्याची सुधारणा करणेकामी मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन नि.र.रू.62,35,774/- (अक्षरी र.रु.बासष्ठ लाख पस्तीस हजार सातशे चौ-याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.61,54,139/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.61,54,139/- पेक्षा 27.00% कमी म्हणजेच र.रु.44,92,521/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.24,735/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.56,900/- = एकुण र.रु.45,74,156/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४० | विषय क्रमांक – २०
दिनांक – २२/०८/२०१९ | विभाग – ड क्षेत्रीय
सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे कडील पत्र क्र.डक्षेका/३/कावि/२५३/२०१९ दि.१३/०८/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र ‘अ’ मधील (1 ते 4) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश

देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४१ विषय क्रमांक – २१

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – ग क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.राहूल कलाटे अनुमोदक – मा.शितल शिंदे

संदर्भ – मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचे कडील पत्र क्र.गक्षेका/आ/४/कावि/५६८/२०१९ दि.१४/०८/२०१९

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

ग क्षेत्रीय कार्यालयीतील कचरा उचलणे व वाहतुक करणे कामकाज हे अत्यावश्यक सेवेचे असून, मा.आयुक्त सो, यांचेकडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/४६०/२०१७ दि.०७/०८/२०१७ अन्वये प्रभाग समित्याची रचना पुर्नरचना झालेली आहे. त्यानुसार नविन प्रभाग रचनेनुसार ग क्षेत्रीय कार्यालयाची दि. ०९/०८/२०१७ रोजी अस्तित्वात आले आहे. त्यानुसार 'ब' क्षेत्रीय कार्यालयातील जुने प्रभाग क्र. ४९,५०,५१ यांचा "ग" क्षेत्रीय कार्यालयामधील नविन प्र.क्र.२३ व २४ मध्ये व ड क्षेत्रीय कार्यालयातील जुने प्रभाग क्र.५२,५३,५४,५५ यांचा "ग" क्षेत्रीय कार्यालयामधील नविन प्र.क्र.२१ व २७ मध्ये समावेश झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ग क्षेत्रीय आरोग्य कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ मधील दैनंदिन घरोघरचा कचरा, कुंड्यामधील कचरा, सार्वजनिक ठिकाणी साठणारा कचरा, गटर्सच्या कडेचे कचरा ढिग, मोकळ्या जागेतील कचरा ढिग दैनंदिन उचलुन महानगरपालिकेच्या मोशी कचरा डेपो येथे टाकणेच्या कामासाठी 'ब' क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील ठेकेदार मे जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरी यांना प्रति दिन प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५१३०/- व भोसरी कचरा स्थाणांतरण केंद्र येथे कचरा खाली करण्यासाठी प्रति दिन प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.४९००/- या दराने आदेश क्र. बक्षेआ/५/कावि/१००७/१६ दि.३१/१२/२०१६ अन्वये आदेश देण्यात आलेले आहे. तरी 'ब' क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील मे.जय गणेश एंटरप्रायजेस,पिंपरी यांच्या आदेशाची मुदत दि.३१/१२/१७ रोजी संपुष्टात आलेली होती. सदर कामकाजास, 'ब' क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील पत्र क्र. १) बक्षेआ/५/कावि/८१०/२०१७ दि.०८/१२/२०१७ व २) बक्षेआ/५/कावि/८३२/२०१७ दि.१६/१२/२०१७ नुसार कचरा उचलणे व वाहतुक करणेसाठी मे.जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरी यांना ग क्षेत्रीय कार्यालयामार्फत कामकाजाची मुदतवाढ घेण्यात येऊन आपल्या सत्रावर कामकाज करण्यात यावेत असे कळविलेले आहे. दि.०९/०८/२०१७ रोजी पासुन ६ क्षेत्रीय कार्यालया ऐवजी ०८ क्षेत्रीय कार्यालयाची निर्मिती झाल्याने ब क्षेत्रीय कार्यालयाकडील ०३ ट्रक/टिपर वाहने व ड क्षेत्रीय कार्यालयाकडील ०४ ट्रक/टिपर वाहने असे एकुण ०७ वाहने मे.जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरी यांच्यामार्फत पुरविण्यात आलेले आहे. मा.स्थायी समितीची सदर संस्थेच्या कामास व होणा-या खर्चाची पहिली मुदतवाढ दि.१/१/१८ ते ३१/३/१८ व दुसरी मुदतवाढ दि.१/४/१८ ते ३०/६/१८ व तिसरी मुदतवाढ दि.०१/०७/२०१८ ते ३१/१२/२०१८ व चौथी मुदतवाढ दि.१/१/२०१९ ते ३१/३/२०१९ व पाचवी मुदतवाढ दि.१/४/२०१९ ते ३०/४/२०१९ अखेर मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापि कचरा उचलणे व वाहतुक करणे कामकाज हे

अत्यावश्यक सेवेचे असून, मे.जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरी यांना या कामासाठी टिपर ट्रक ७.५ मे.टन क्षमता असणारे प्रति दिन, प्रति वाहनावर दोन खेपांसाठी एक वाहन चालक + चार मजूर + इंधनासह एकुण ०७ वाहने भाडे तत्वावर पुरविण्यासाठी दि.०१/०५/२०१९ ते ३०/०६/२०१९ अखेर मुदतवाढ मिळाणेस तसेच सदर कामाचे अपेक्षीत अंदाजीत खर्च र.रु.२३,००,०००/- (अक्षरी र.रू.तेवीस लाख फक्त) या येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच दि.०१/०७/२०१९ पासून नविन ठेकेदारांनी कचरा वाहतुकीचे काम सुरू केले आहे. तथापि जुने ठेकेदार तसेच स्वयंरोजगार संस्था यांनी दि.०१/०७/२०१९ पासून काम जाणार या भावनेने दि.२०/०६/२०१९ ते ३०/०६/२०१९ या कालावधीत कचरा उचलणे व वाहतुकीचे काम व्यवस्थीत केले नाही असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कचरा उचलणे व वाहतुकीचे कामावर प्रचंड ताण आला असून त्याची चौकशी करणेत यावी. अ, ब, ग व ड क्षेत्रीय कार्यालयाकडील सदर ठेकेदार तसेच स्वयंरोजगार संस्था चौकशीत दोषी आढळल्यास त्यांचे जून २०१९ अखेर बील अदा करताना त्यांचेवर दंडात्मक कारवाई करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४२ विषय क्रमांक – २२
दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – ड क्षेत्रीय
सूचक – मा.राहूल कलाटे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे कडील पत्र क्र.डक्षे/८/कावि/२६३/१९ दि.१४/०८/१९

मा.आरोग्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सर्व कचरा कुंड्या, रस्त्याचे, गटर्सच्या कडेचे कच-याचे ढीग, मोकळ्या जागेतील कच-याचे ढीग उचलणे व त्याची वाहतुक करुन भोसरी स्थानांतर केंद्र अथवा मोशी कचरा डेपो येथे टाकणेकामी निविदा नोटीस क्र.५/२०१५-१६ अन्वये आरोग्य विभाग ड क्षेत्रिय कार्यालया मार्फत निविदा प्रसिध्द करुन कामाचे दर मागविणेत आले होते. त्यानुसार मे. जयगणेश एंटरप्रायजेस यांचे दर मान्य करुन कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाची मुदत दि.३१/०५/२०१९ रोजी संपत आहे.व नविन ठेकेदारामार्फत दि.१/७/२०१९ पासून कामकाज सुरु करणेत येणार आहे. त्यामुळे दि.१/०६/२०१९ पासुन सदर कामाची आवश्यकता आहे .प्रस्तावात नमुद प्रमाणे ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील कचरा उचलणे व वाहतुक करणे या कामासाठी दि. १५/१०/२०१६ रोजी करणेत आलेला सिलबंद करारनाम्यातील अटी शर्ती कायम ठेवून दि.०१/०६/२०१९ ते दि.३०/०६/२०१९ अखेर मे.जयगणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगांव यांनी भोसरी कचरा स्थानांतर केंद्रासाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,२५०/- व मोशी कचरा डोपोसाठी प्रतिदिन प्रतिवाहन दोन खेपांसाठी ४ मजुर १ वाहनचालकांसह र.रु.४,४५०/- या दराने एकुण १४ टिपर/ट्रक वाहने पुरविणेस व याकामी अंदाजीत अपेक्षीत खर्च र.रु.२०,००,०००/- (अक्षरी र.रू.वीस लाख फक्त) येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच दि.०१/०७/२०१९ पासून नविन ठेकेदारानी कचरा वाहतुकीचे काम सुरू केले आहे. तथापि जुने ठेकेदार तसेच स्वयंरोजगार संस्था यांनी दि.०१/०७/२०१९ पासून काम जाणार या भावनेने दि.२०/०६/२०१९ ते

३०/०६/२०१९ या कालावधीत कचरा उचलणे व वाहतुकीचे काम व्यवस्थीत केले नाही असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कचरा उचलणे व वाहतुकीचे कामावर प्रचंड ताण आला असून त्याची चौकशी करणेत यावी. अ, ब, ग व ड क्षेत्रीय कार्यालयाकडील सदर ठेकेदार तसेच स्वयंरोजगार संस्था चौकशीत दोषी आढळल्यास त्यांचे जून २०१९ अखेर बील अदा करताना त्यांचेवर दंडात्मक कारवाई करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४३ विषय क्रमांक – २३

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.आरती चौंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.हक्षेका/स्था/जा/३५४/२०१९ दि.१/८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत प्रभाग क्र.३२ मधील मधूबन भागात मुळा नदीलगत H.T. लाईन खालील विकास आराखड्यातील १२ मी. डी.पी. रस्ता रूंद करणेकरिता मे.इन्फिनिटी कन्सल्टिंग इंजिनियरर्स यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.२४% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.७४% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४४ विषय क्रमांक – २४

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.हक्षेका/स्था/जा/३५५/२०१९ दि.१/८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत प्रभाग क्र.३२ सांगवी मधील माकनचौक ते शुध्दीकरण केंद्र ते वसंतदादा पाटील पुतळा व परिसरातील रस्ते आत्याधुनिक पध्दतीने विकसित करणेकामी मे.इन्फिनिटी कन्सल्टिंग इंजिनियरर्स यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्र्चात १.२४% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.७४% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४५ विषय क्रमांक – २५

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.हक्षेका/स्था/जा/३५३/२०१९ दि.१/८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

पिं.चिं.मनपाच्या ह क्षेत्रीय स्थापत्य विभागांतर्गत प्रभाग क्र.३२ मधील सांगवी परिसरातील मुख्य रस्ते अद्यावत पध्दतीने विकसित करणेकामी मे.इन्फिनिटी कन्सल्टिंग इंजिनियरर्स यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेस निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्चात १.२४% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.७४% फी अदा करणेस मान्यता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४६ विषय क्रमांक – २६

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.मातंवि/२/कावि/१२३/२०१९ दि.१६/७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सारथी हेल्पलाईन अंतर्गतकॉल ऑपरेटर नियुक्त करणेकामी निविदा सुचना क्र.मातंवि/०१/२०१९-२० चे लघुत्तम दरानुसार मे.Tech 9 Services या संस्थेकडून दरमहा प्रतिव्यक्ती र.रु.२३,६८४/- (अक्षरी र.रु.तेवीस हजार सहाशे चौ-याऐंशी फक्त) अधिक कर नुसार पुढील १ वर्ष कालावधीसाठी १० कॉल ऑपरेटर नियुक्त करणेकामी येणा-या एकूण र.रु.२८,४२,०८०/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस लाख बेचाळीस हजार ऐंशी फक्त) अधिक कर चे खर्चास व त्यांचेसोबत कामाचा करारनामा करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४७ विषय क्रमांक – २७

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे कडील पत्र क्र.विमुका/५/कावि/३९२/१९ दि.१६/०८/२०१९

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र Ele/Ho/F/28/4/2018-19 अन्वये फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध शहरी गरीब वस्तीमध्ये प्रकाश व्यवस्था करणे वा इतर विद्युत विषयक तत्सम कामे करणेकामी २०१८-१९ मे.विमलाई इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन नि.र.रू.26,76,475/- (अक्षरी र.रु.सव्वीस लाख शहात्तर हजार चारशे पंचाहत्तर फक्त) पेक्षा 21.51% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.21,00,765/- पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे

त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५२४८ विषय क्रमांक – २८

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – ड क्षेत्रीय, विद्युत

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे कडील पत्र क्र.डक्षे/वि/वाकड/२९३/२०१९ दि.१४/०८/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय विद्युत विभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर व प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव परीसरातील स्ट्रिट लाईटकरीता वीजपुरवठ्याचे वीज मीटरकरीता म.रा.वि.वि.कं ला र.रू.46,275/- (अक्षरी र.रू.शेहेचाळीस हजार दोनशे पंचाहत्तर फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५२४९ विषय क्रमांक – २९

दिनांक – २२/०८/२०१९ विभाग – स्थापत्य, BRTS

सूचक – मा.राहूल कलाटे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/ BRTS/६२९/२०१९ दि.१६/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचाराच घेवून –

राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणातर्फे पुणे-बेंगलोर द्रुतगती मार्ग (पिं.चिं.मनपा हद्दीपर्यंत) विकास आराखड्यानुसार ६०.०० मी. रुंदीचा रस्ता विकसित करणेत आलेला आहे. सदरचा रस्ता वाकड ते मुकाई चौका दरम्यान मनपा हद्दीतून जाणारा बेंगलोर व मुंबई ला जोडणारा मुख्य महामार्ग असून पुढे मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा शहरातील मुख्य रस्ता आहे. ह्या रस्त्यालगत हिंजवडी आयटीपार्क तसेच वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत इ. गावांचा नव्याने विकसित होणारा भाग आहे. उपरोक्त नमूद गावांसाठी हा प्रमुख रस्ता असल्याने सदर रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. सदर रस्त्यावरील वाकड ते मुकाई चौक या भागातील रस्त्याच्या दोन्ही बाजुचा पिंपरी चिंचवड मनपा विकास आराखड्यात समाविष्ट असलेला १२.०० मी. रुंदीचा सेवा रस्ता विकसित करण्याचे नियोजित आहे. सदर रस्ता अविकसित असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत असून नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे सदरचा रस्ता विकसित करणेबाबत मा.नगरसदस्य व स्थानिक नागरिकांनी मागणी केली आहे. सदर वाकड ते मुकाई चौक येथील सेवा रस्त्याचे उर्वरीत काम करणेसाठी मा.महापालिका सभा ठराव क्र.४२२ दि.२२/०६/२०१९ अन्वये र.रु.९८ कोटीची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. रस्ता रुंदीकरणाची कामे करणेसाठी परिसराचे नियोजन करुन आराखडे तयार करणे, दरपृथ्थकरण करणे, निविदा पुर्व (Pre-Tender) आणि निविदा पश्चात(Post Tender) इतर कामे करावी लागणार आहेत. त्यासाठी अश्या प्रकारच्या कामांचा अनुभव असणारे व मनपाचे सल्लागार पॅनेलवर असणारे मे.इन्फ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनिअर्स प्रा.लि. यांची

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रकल्प सल्लागाराचे नाव | फी |
|---|---|---|---|
| १ | मुंबई - बेंगलोर द्रुतगती महामार्गालगत पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील १२.०० मी. रुंद सेवारस्ता विकसित करणे व अनुषंगिक कामे करणे. | मे. इन्फ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनिअर्स प्रा. लि. | २% |

मनपाच्या मान्य प्रस्तावानुसार व शासन निर्णयानुसार प्री टेंडर व पोस्ट टेंडर साठी खालील तक्त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना फी अदा करावी लागणार आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या/कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | |
|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्व कामांसाठी |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०७५%(डीपीआर ०.५०% + प्र.मा.- ०.२५%) | ०.५० (डीपीआर ०.३३% +प्रमा-०.१७%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६ |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.३० |
| ७ | सेवाहमी कालावधीकरीता | - | ०.१० |
| | **एकुण** | ३.००% | २.००% |

